सात्त्विक कलांचे सादरीकरण : रांगोळी - खंड २

देवतातत्त्वे आणि आनंद आदी स्पंदनांनी युक्त

# सात्त्विक रांगोळ्या

मराठी (Marathi)


संकलक

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**कु. संध्या पुंडलिक माळी**



**सनातन संस्था**

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या १०,००० प्रती आणि या
लघुग्रंथाच्या आतापर्यंत ४,२६,३०० प्रती प्रकाशित !

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना !

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : फेब्रुवारी २०२३ पर्यंत ३६० ग्रंथांच्या १७ भाषांत ९२ लाख ८१ सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘**www.Sanatan.org**’.)

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥

– जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

---

# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

‘१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

॥ श्री सरस्वतीदेव्यै नमः ॥

विद्यादायी श्री सरस्वतीदेवीने आम्हाला विविध देवतांची तत्त्वे आकृष्ट करणाऱ्या रांगोळ्या काढण्याचे ज्ञान देऊन हा ग्रंथ साकार करावा, यासाठी तिच्या मंगल चरणी प्रार्थना !

## लघुग्रंथाचे मनोगत

### १. उद्देश

रांगोळ्यांची अनेक पुस्तके उपलब्ध असतांना 'रांगोळी' या विषयावर लघुग्रंथ काढण्याचा उद्देश असा की, 'सात्त्विक रांगोळी' असे काहीतरी असते, हे सर्वांना समजावे.

### २. महत्त्व

हिंदु धर्मातील सर्व सण, तसेच विधी कोणत्यातरी देवतेशी संबंधित असतात. त्या त्या सणाच्या दिवशी किंवा विधीच्या वेळी त्या त्या देवतेचे तत्त्व वातावरणात नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात असते किंवा

विधीमुळे तेथे आकृष्ट होते. ते तत्त्व आणखी जास्त प्रमाणात यावे व त्याचा सर्वांना लाभ व्हावा; म्हणून ते तत्त्व आकृष्ट, तसेच प्रक्षेपित करणाऱ्या रांगोळ्या या लघुग्रंथात दिल्या आहेत. या रांगोळ्यांमुळे देवतेचे तत्त्व आकृष्ट व प्रक्षेपित झाल्यामुळे तेथील वातावरण त्या तत्त्वाने भारित होऊन त्याचा सर्वांना लाभ होतो. रांगोळ्या सकाम उद्देशांसाठीदेखील काढता येतात; परंतु या लघुग्रंथात साधनेला पूरक अशाच देवतांची तत्त्वे आकृष्ट करणाऱ्या रांगोळ्या दिल्या आहेत.

## ३. वैशिष्ट्ये

अ. ‘शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध व त्यांची शक्ती एकत्रित असते’, या अध्यात्मातील तत्त्वानुसार रांगोळीचे रूप व रंग यांत थोडा जरी बदल केल्यास रांगोळीतील स्पंदने कशी बदलतात, हे रंगीत पानांवर घेतलेल्या श्री गणपति, श्रीराम, दत्त व श्री दुर्गादेवी ही तत्त्वे असलेल्या रांगोळ्यांवरून लक्षात येते.

आ. प्रत्येक देवतेमुळे शक्ती, भाव, चैतन्य, आनंद व शांती या पाचही प्रकारच्या अनुभूती येऊ शकतात. या लघुग्रंथात दिलेल्या रांगोळ्यांत कोणते तत्त्व आहे, हे दिले आहे.

इ. रांगोळ्यांत देवतेचे जास्तीतजास्त १० टक्के तत्त्व आणता येऊ शकते. या लघुग्रंथातील रांगोळ्यांत देवतेचे जास्तीतजास्त तत्त्व आकृष्ट होण्यासाठी सनातनच्या साधकांनी त्या भावपूर्ण काढण्याचा प्रयत्न केला आहे. साधकांचा भाव व पातळी वाढत गेली की, रांगोळ्यांतील देवतातत्त्वाचे प्रमाण १० टक्क्यांच्या अधिकाअधिक जवळ जाऊ लागते.

## ४. रांगोळीची निवड

४ अ. सण, व्रते व उत्सव यांनुसार : लघुग्रंथात सण, व्रते व उत्सव कोणत्या तिथीला येतात, त्याचा तक्ता आहे. त्यात देवतेचे तत्त्व आकृष्ट करणारी रांगोळी कोणत्या पृष्ठावर दिली आहे, हे दिले आहे.

## ५. विविध प्रसंगी उपयुक्त

वाढदिवस, औक्षण इत्यादी प्रसंगी दरवाजात, तसेच ताटाभोवती आनंददायी रांगोळ्या कशा असाव्यात, हेही या लघुग्रंथात दिले आहे.

## ६. व्यावहारिक सूचना

लघुग्रंथातील रंगीत पृष्ठांवरील रांगोळ्यांत दिलेले रंग शक्यतो रांगोळ्यांमध्ये वापरावेत. ते रंग सात्त्विक आहेत. त्यांच्यामुळे रांगोळीची सात्त्विकता वाढायला साहाय्य होते. रांगोळीची सात्त्विकता वाढली की, देवतेचे तत्त्व आकृष्ट होऊन उपासकाला त्याचा लाभ होतो. तसेच वायूमंडलही शुद्ध होते.

## ७. प्रार्थना

‘या लघुग्रंथामुळे फक्त रांगोळ्याच नाहीत, तर सर्वच गोष्टी सात्त्विक होतील, यासाठी सर्वांचे प्रयत्न सुरू होवोत’, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**